उप-विभागीय पोलीस अधिकारी,कार्यालय,
सातारा शहर विभाग

दुरध्वनी क्रमांक - ०२१६२/२३४८८६

Email-sdposcity.satara@mahapolice.gov.in


-: प्रेसनोट :- दिनांक- २९/०६/२०२५.

-------०००-------

## सातारा पोलीसांची मोठी कारवाई
## (सातारा शहर, वडुज पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीर जिलेटीन कांडया, डीटोनेटर, अमोनिअम, नायट्रेट स्फोटकाचा साठा जप्त,)

श्री. निखील पिंगळे, पोलीस अधीक्षक, सातारा व श्रीमती डॉ. वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी सातारा जिल्हयात बेकायदेशरीपणे स्फोटक पदार्थांची वाहतुक तसेच साठा करणाऱ्या इसमांची गोपणीय माहिती प्राप्त करून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. त्याप्रमाणे सातारा पोलीसांनी दोन ठिकाणी छापा प्रक्रिया राबवुन स्फोटकांची अवैध विक्री व साठवणुक करणारे इसमांचेविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक २५/०६/२०२६ रोजी सातारा शहर पोलीस ठाणेचे हददीतील दगडी खाण, खिंडवाडी, ता.जि.सातारा येथे पंचासह छापा प्रक्रिया राबवुन दगड खाणीत एका लोखंडी कंटेनर वाहनामध्ये अत्यंत स्फोटक जिलेटीन कांडया, डीटोनेटर व अमोनिअम नायट्रेट साठा ठेवला असल्याचे गोपनिय माहीती प्राप्त झालेने श्री.राजीव नवले उपविभागीय पोलीस अधिकारी साताराशहर,पोनि सचिन म्हेत्रे,व पोलीस पथकातील अधिकारी अमंलदार यांनी सदर ठिकाणी जावुन छापा टाकला असता इसम नामे शिवराज बलदेव चौधरी,वय ५० वर्षे,रा.खिंडवाडी दगडाचे खाणीमध्ये,ता.जि.सातारा मुळ रा.सिरेडी ता.बरेडा जि.भिलवाडा, राजस्थान याने उडवाउडवीची उत्तरे दिली त्याचेकडे स्फोटक पदार्थ असल्याने बीडीडीएस व फॉरेन्सिक पथकाकरवी तपासणी करुन व सर्व परीसर निर्मनुष्य करुन तपासणी केली असता त्याचेकडे एकुण ४८० किलो अमोनिअम नायट्रेट, एकुण २४२३ जिलेटीन कांडया, एकुण १८९० डिटोनेटर्स असा एकुण **१,५४,२८५/-** किंमतीचा स्फोटक पदार्थ मुददेमाल जप्त करण्यात आला. असुन आरोपी व त्याचे इतर साथीदार यांचेविरुध्द सातारा शहर पोलीस ठाणे गुरन-५३५/२०२६ बारी पदार्थ अधिनियम १८८४ चे कलम ९(बी),१(बी) सह बारी अधिनियम १९०८ चे कलम ५ व बीएनएस २८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी नामे शिवराज बलदेव चौधरी यास गुन्हयाचेकामी अटक करण्यात आली असुन गुन्हयाचे तपासात विशाल जाट, बाबुलाल जाट, शंकर बेनीराम चौधरी सर्व रा.मायणी जि.सातारा यांना निष्पन्न करण्यात आले असुन आरोपी शिवराम चौधरी याची दिनांक २९/६/२०२६ रोजीपर्यत पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.

वरील नमुद गुन्हयातील आरोपी विशाल जाट, बाबुलाल जाट रा.मायणी जि.सातारा या आरोपीनी वरील प्रमाणे गुन्हा केल्यानंतर परांगदा होवुन मायणी गरवारे वस्ती ता.खटाव येथे त्यांच्या ताब्यातील टाटा कंपनीची व्हॅन व पांढऱ्या रंगाच्या दोन बलेरो गाडयांमधुन जिलेटीन व इतर

स्फोटक पदार्थांची बेकायदेशरीपणे विक्री करीता आले असल्याची माहीती मिळालेनें स्थानिक गुन्हे शाखा सातारा व  वडुज पोलीस स्टेशन यांनी संयुक्तिकरित्या छापा प्रकिया राबवुन संशयीत वाहनांची झडती घेतली असता, संशयीत वाहने १) टाटा व्हॅन क्रमांक एम डल्यु एफ -४४५१ २) बलेरो वाहन क्रमांक - एम एच ११ डीव्ही -२५५५  ३) बलेरो वाहन क्रमांक- एमएच ११ डी एम -२५५५ अशा वाहनामध्ये खाकी रंगाचे SUPERPOWER 90X, DANGER-EXPLOSIVES असे लिहलेल्या बॉक्स मध्ये. जिलेटीन कांडयाचे ९ बॉक्स त्यामध्ये १८०० नग, विविध प्रकारचे डिटोनेटर्स त्यामध्ये इलेक्ट्रीक, नॉन इलेक्ट्रीक, ऑर्डिनरी डिटोनर्स, कॉर्टेक्स व सेफ्टी फ्युज  असा एकुण **१७,०९,९००/-** रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्याअनुषंगाने वडुज पोलीस ठाणे गुरन १५०/२०२६ बारी पदार्थ अधिनियम १८८४ चे कलम ९(बी),१(बी) सह बारी अधिनियम १९०८ चे कलम ५ व बीएनएस २८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. छापा कारवाईत आरोपी विशाल जाट व बाबुलाल जाट यांना तपास कामी अटक करणेत आली असुन त्यांची मा.न्यायालयाने दोन दिवस पोलीस कस्टडी रिमांड मंजुर  आहे.  तसेच गुन्हयामध्ये शंकर बेनीराम चौधरी वय ५० वर्षे रा. मायणी ता. खटाव याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झालेला असून त्याचा शोध सुरू आहे.

अशाप्रकारे वरील दोन्ही गुन्हे हे स्फोटक पदार्थाचा साठा करुन विक्री करणे अनुषंगाने वडुज पोलीस ठाणेचे गुन्हयातील अटकेतील आरोपी विशाल जाट व बाबुलाल जाट वडुज पोलीस ठाणेचे गुन्हयामध्ये सध्या अटकेत असुन त्यांचा **सातारा शहर पोलीस ठाणेचे गुरन ५३५/२०२६** या गुन्हयामध्ये सहभाग निष्पन्न झाला असुन दोन्ही आरोपींचा गुन्हयात ताबा घेवुन अधिकचा तपास चालु आहे.

सदर कारवाई श्री. निखील पिंगळे, पोलीस अधीक्षक, सातारा व श्रीमती डॉ. वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा, यांच्या मार्गदर्शनाखाली मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो, सातारा विभाग राजीव नवले, स्थानिक गुन्हे शाखेचे श्री. विश्वजीत घोडके, सातारा शहर पोलीस ठाणेचे पोनि.सचिन म्हेत्रे, सातारा तालुका पोलीस ठाणे पोनि.निलेश तांबे तसेच वडुज पोलीस स्टेशनचे श्री. घनश्याम सोनवणे, स्थानिक गुन्हे शाखा, सातारा शहर पोलीस ठाणे व सातारा तालुका पोलीस ठाणे डी.बी. पथकातील अमंलदार, बीडीडीएस पथक, फॉरेन्सिक युनिट यांनी केली असल्याने श्री. निखील पिंगळे, पोलीस अधीक्षक, सातारा व श्रीमती डॉ. वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी कारवाई करणाऱ्या अधिकारी व अंमलदार यांचे अभिनंदन केले आहे.

---

मा. पोलीस अधीक्षक सो, सातारा यांचे मान्यतेने.